MHWR020016092021

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार/वादी रमाबाई महिला बचत गट यांनी तुर्तातुर्त/तात्पुरता मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार/वादी यांचे असे कथन आहे की अर्जदार/वादी यांचा महिला बचत गट असून त्याची पंचायत समीती वर्धा येथे रितसर नोंदणी झाली आहे. सदर महिला बचत गट हा सावंगी मेघे या मर्यादीत कार्यक्षेत्रात कार्यरत आहे. गैरअर्जदार/प्रतिवादी क्र. २ जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा यांनी सावंगी मेघे या गावाकरिता नविन स्वस्त धान्य दुकान वितरीत करण्याकरिता नोटीफिकेशन काढलेले आहे. अर्जदार/ वादी यांचे असे कथन आहे की नविन स्वस्त धान्य दुकान वितरीत करण्याकरिता ग्रामसभेचा ठराव शासकीय नियमानुसार आवश्यक असतांना गैरअर्जदार/प्रतिवादी क्र. २ यांनी तसा ठराव न घेता गैरअर्जदार/प्रतिवादी क्र. २ हे दुस–या गटास परवाना वितरीत करण्याच्या प्रयत्नात आहे. सदर आदेशात्मक तरतुदी शिथील करण्याबद्दल कोणतेही मार्गदर्शक तत्वे नसतांना प्रतिवादी/गैरअर्जदार क्र. २ नविन परवाना वितरीत करण्याच्या घाईमध्ये आहे. प्रतिवादी क्र. २ चा हेतू लक्षात घेता अर्जदार वादी यांनी प्रतिवादी क्र. २ याना दि. ११/६/२००१ रोजी अधिवक्त्यामार्फत नोटीस पाठविली. मात्र सदर नोटीसला गैरअर्जदार/प्रतिवादी यांनी उत्तर दिलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदार/प्रतिवादी नविन परवाना वितरीत करण्याची शक्यता आहे आणि तसा नविन परवाना दुस–या गटाचा वितरीत

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHWR020016092021/truecopy/order-1.pdf

करण्यापासून एकतर्फा मनाई आदेश गैरअर्जदार/प्रतिवादी विरुध्द पारित करावा.

२. अर्ज, त्यासोबतची कागदपत्रे पाहिली. अर्जदार/वादीतर्फे अधिवक्ता यांनी युक्तीवाद केला. त्यांनी युक्तीवादामध्ये अर्जामधील कथनांचा पुर्नरुच्चार केला. येथे हे नमुद करणे उचित ठरेल की सदर प्रकरणाप्रमाणे प्रतिवादी हे महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी हे आहे. सदर प्रतिवादी हे शासनाचे प्रतिनिधी आहे. त्यामुळे सदर अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकल्याशिवाय कोणताही एकतर्फी आदेश पारित करणे योग्य ठरणार नाही. सदर अर्जावर गैरअर्जदार/प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकणे आवश्यक आहे. सबब सदर अर्ज का मंजुर करण्यात येवू नये अशी कारणे दाखवा नोटीस गैरअर्जदार/प्रतिवादी यांना काढावी.

(सु. शं. शिन्दे)

दिनांकः १८.०८.२०२१. २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
वर्धा.

Visit ecourts.gov.in for updates or download mobile app “eCourts Services” from Android or iOS

www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHWR020016092021/truecopy/order-1.pdf

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V. M. Mandade (Grade-II) |
| Court | : | 2nd Jt.C.J.S.D. Wardha. |
| Order delivered on | : | 18.08.2021 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 18.08.2021 |
| Order uploaded on | : | 18.08.2021 |

www.ecourtsindia.com

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHWR020016092021/truecopy/order-1.pdf